खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

## मराठी विभाग – वाचकवीर पुरस्कार

सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ४ हजारांची पुस्तके देऊन गौरव

### प्रणव टिमुणे याला पहिला वाचकवीर पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त अवांतर पुस्तकांचे वाचन करावे आणि वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने वाचकवीर स्पर्धा घेण्यात आली. वर्षभरात सर्वाधिक पुस्तकांचे वाचन करणाऱ्या तृतीय वर्ष कला शाखेतील प्रणव टिमुणे याला पहिला वाचकवीर पुरस्कार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि सुमारे ४ हजारांची पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, योगेश टिमुणे, स्नेहल टिमुणे आणि सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

कोणत्याही व्यक्तीच्या निरोगी शारीरिक वाढीसाठी जसा चौरस आहार गरजेचा असतो. तसा माणसाच्या मनाच्या निरोगी वाढीसाठी वाचन आवश्यक असते. वाचनाने बुद्धी, मन यांचा विकास होतोच; पण सहृदय माणसाची जडणघडण वाचनामुळे होते, असे संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सांगितले. तसेच वाचन संस्कृतीमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात नक्की बदल घडेल असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रणव टिमुणे व योगेश टिमुणे या मुलाने मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी वाचकांस प्रोत्साहन मिळावे यासाठी मराठी विभागाने वाचकवीर स्पर्धेचे आयोजन केल्याचे डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले. आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

दै. राष्ट्रसंचार

पुण्य नगरी

# प्रणव टिमुणे याला वाचकवीर पुरस्कार प्रदान

**। शिरोली : प्रतिनिधी**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त अवांतर पुस्तकांचे वाचन करावे आणि वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने वाचकवीर स्पर्धा घेण्यात आली. वर्षभरात सर्वाधिक पुस्तकांचे वाचन करणाऱ्या तृतीय वर्ष कला शाखेतील प्रणव टिमुणे याला पहिला वाचकवीर पुरस्कार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि सुमारे ४



हजारांची पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप होते. या प्रसंगी साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, योगेश टिमुणे, स्नेहल टिमुणे आदी उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, कोणत्याही व्यक्तीच्या निरोगी शारीरिक वाढीसाठी जसा चौरस आहार गरजेचा असतो तसा माणसाच्या मनाच्या निरोगी

Smart Pimpri Chinchwad Edition
Apr 9, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**